दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६३ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१६ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## घरातून फेसबुक लाईव्ह करून काहीही होत नाही

# जनतेत फेस टू फेस जावे लागते,मुख्यमंत्री एकनाथ शिंदेची उद्धव ठाकरेंवर टीका

**मुंबई (वृत्तसंस्था) –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर पुन्हा एकदा टीका केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे राज्यभरात सभा घेत आहेत. यावर शिंदे म्हणाले की, घरात फेसबुक लाईव्ह करून काहीही होत नाही. तसेच कडकनाथ होऊनही चालत नाही. त्यासाठी जनतेतच जावं लागतं.शिंदे पुढे म्हणाले की, आधी जी कामे झाली नाहीत. ती कामे १० वर्षात मोदी गॅरंटीमध्ये करण्यात आली. सरकार हे संवेदनशील असायला पाहिजे. घरात बसून फेसबुक लाईव्ह न करता फेस टू फेस जावे लागते. सध्या देशभरात मोदी गॅरंटी बोलत आहे.**

केवळ माझे कुटुंब हीच माझी जबाबदारी नाही तर हे सर्व माझं कुटुंबच आहे. मच्छीमारांची मागणी पूर्ण करण्याचे आदेश आयुक्तांना दिल्याचेही शिंदेंनी यावेळी सांगितले. तसेच आज जे उद्घाटन होत आहे, यात महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा होणार असल्याचेही शिंदे यावेळी म्हणाले. महिला वार्डमध्ये पुरूष उमेदवार उभा राहू शकत नाही. महिला याच कुटुंबाचा आधार असतात. त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे हीच काळाची गरज आहे.पायलटपासून अगदी युद्ध पाणबुडीपर्यंत सगळीकडे महिला आहेत. आपल्या देशातील सर्वोच्च पदावर असलेल्या राष्ट्रपती देखील आपल्या महिला भगिनी आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. आदिवासी महिलेला सर्वोच्च पदावर संधी देण्याचा बहुमान आपल्या देशाला मिळालेला आहे आणि म्हणून नारीशक्ती कुठेही मागे नाही.मोदींनी महिला आरक्षणाचा निर्णय घेतला. महिलांना प्रत्येकी १ लाख देणारी ही पहिली महापालिका आहे. महिला सुरक्षेसाठी नियोजन करण्याचा सूचना देण्यात आल्या. महिलांना काही त्रास झाला तर लगेच मदत मिळते. पोलिसांची मदत घेऊन महिला सुरक्षा अभियान हे सुरू केल्याचंही शिंदेंनी सांगितले.

कुठल्याही महिलेला कोणतीही अडचण असेल तर त्यांना तात्काळ मदत मिळायला हवी. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तज्ञांची मदत घेऊन लवकरात लवकर महिलांना मदत मिळवून



देण्याच्या सूचना शिंदेंकडून देण्यात आल्या आहेत. ६० लाख महिलांना आम्ही जोडलेले आहे. ते २ कोटी पर्यंत गेले पाहिजे. आधीच्या सरकारने अहंकार पाहून सर्व बंद केले होते. राज्याने अहंकार बाजूला ठेवला पाहिजे. मी मुख्यमंत्री आहे मात्र स्वतःला कडकसिंग बनल्यावर कोण भेटेल. यामुळे अंतर वाढत जाते, अशी टीका देखील त्यांनी ठाकरेंवर केली आहे.

### २५ कोटी रुपयातून वढा तीर्थक्षेत्राचा होणार दैदिप्यमान विकास

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नातून वढा तिर्थ क्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भातील पंढरपूर समजल्या जाणा-या वढा तिर्थक्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प आमदार किशोर जोरगेवार यांनी केला होता. यासाठी शासन दरबारी त्यांचा सतत पाठपुरावा सुरु होता. त्यांच्या या पाठपूराव्याला यश आले असुन सदर विकासकामासाठी पहिल्या टप्यात २५ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. या निधीतून वढा तीर्थक्षेत्राचा दैदिप्यमान विकास होईल असा विश्वास आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला आहे.



चंद्रपूरातील माता महाकाली मंदिर आणि वढा येथील विठ्ठल रुखमाई मंदीराचा विकास करण्याच्या संकल्प आमदार किशोर जोरगेवार यांनी केला आहे. माता महाकाली मंदिराच्या विकासासाठी दुसऱ्या टप्यात ७५ कोटी रुपयांची मागणी त्यांनी केली आहे. तर वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी अर्थसंकल्पात जवळपास ४५ कोटी रुपये मंजुर झाले होते. यातील २५ कोटी रुपयांच्या कामाचा आराखडा मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. विदर्भातील पंढरपुर म्हणुन ओळख असलेल वढा तिर्थक्षेत्र लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असुन या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी आपण कटिबध्द असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले होते. वढा येथे वर्धा - पैनगंगा नदीचा संगम आहे. दोन पवित्र नदयांचा संगम हा धार्मिक दृष्ट्याही पावन असून याचे महत्त्व अधिक आहे. या ठिकाणी भाविकांची श्रद्धा जूळली असल्याने येथे येणा-या भाविकांसाठी योग्य सोयी सुविधा झाल्या पाहिजेत या दिशेने आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. पंढरपुर आणि वढा या तीर्थक्षेत्रात साम्य आहे. या दोन्ही ठिकाणची विठ्ठलाची मुर्ती ही स्वयंभु आहे. दरवर्षी कार्तिकी एकादशीला येथे भरत असलेल्या यात्रेलाही आता भव्य स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे येथे येणा-या भाविकांची योग्य सोय येथे व्हावी यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु होते. नुकतेच मुंबई येथे पार पडलेल्या अधिवेशनातही आमदार किशोर जोरगेवार यांनी वढा तिर्थक्षेत्राच्या विकासाचा विषय उपस्थित करत या मागणीकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते. सदर विकास आराखड्यास चक्राकार पद्धतीने मंजुरी प्रदान करावी अशी मागणी केली होती. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. सदर विकासकामासाठी पहिल्या टप्यात २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसा जिआरही शासनाच्या वतीने प्रकाशी करण्यात आला आहे. यामध्ये मंदिर सभागृह, प्रशासकीय इमारत, पूजा शेड, घाट बांधकाम, छत्री, विसर्जन कुंड, जल निस्सारण, बायोडायजेस्टर, बाग काम सह इतर सोयीसुविधातून मंदिर परिसराचा विकास होणार आहे. त्यामुळे आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहे.

# दोन दिवसांत राजकारणात भूकंप होणार–संजय शिरसाट

**मुंबई (वृत्तसंस्था)** –भाजपने महाराष्ट्रातील २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. तर महायुतीतील मित्र पक्षांनी अद्याप उमेदवारांची नावे जाहीर केलेली नाही. त्यामुळे महायुतीतील जागा वाटपाचा तिढा हा अजूनही कायम आहे. तर रविवार किंवा सोमवारी शिंदे गटाची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मोठे भाकित केले आहे.

शिंदे गटाच्या उमेदवारांची नावे ही सोमवारपर्यंत जाहीर करण्यात येणार असल्याचे संजय शिरसाठ यांनी सांगितले. तसेच राजकीय घडामोडींवर बोलत असतांना शिरसाट म्हणाले की, येत्या दोन दिवसांत राजकारणात मोठ्या घडामोडी घडू शकतात, असे संकेत त्यांनी दिले. शिरसाट यावेळी पत्रकार परिषदेत बोलत होते.शरद पवारांनी महादेव जानकर यांना रासपला लोकसभेची एक जागा देणार असल्याचे आश्वासन दिल्याची माहिती जानकरांनी दिली होती. यावर शिरसाठ म्हणाले की, अनेकजण आता शरद पवारांच्या भेटीला जातील. तसेच जानकरही त्यांच्या भेटीला जातील. त्यासाठी त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. मात्र, येत्या दोन दिवसांत आमच्या शिंदे गटाकडे येणाऱ्यांची संख्या पाहिली तर अनेकांना आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. येत्या सोमवारी मोठे भूकंप पाहायला मिळणार असल्याचे भाकितही त्यांनी यावेळी केले.

AIMIM महाराष्ट्रात लोकसभेच्या सहा जागा लढवण्याची शक्यता आहे. याबाबत छत्रपती संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील यांनी तसे संकेतदेखील दिले आहेत. याबरोबरच खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांचा प्रचार देखील सुरू केला असून २०२४ ची लोकसभा निवडणूक जिंकणार असा दावा ते करत आहेत. यावर शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, प्रत्येक उमेदवार आपल्या शैलीत प्रचार करत असतो. पण यावेळी छत्रपती संभाजीनगरमध्ये AIMIM नावालादेखील उरणार नाही, एवढे निश्चित आहे.लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडीची युती होणार असल्याची चर्चा सरू आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकादेखील पार पडत आहेत. तर महाविकास आघाडीने वंचितसाठी चार जागा देण्याचे मान्य केले. याबाबत शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मोठे विधान केले. ते म्हणाले, आज महाविकास आघाडीची बैठक होत आहे. मात्र, या बैठकीला ॲड. प्रकाश आंबेडकर यांना बोलावले नाही, म्हणजे महाविकास आघाडीला वंचित बहुजन आघाडीसोबत युती करायची नाही, हे स्पष्ट होत आहे. या आघाडीची सुरूवातच बिघाडीची आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

# हंसराज अहीर यांच्या विशेष प्रयत्नातून बहुप्रतिक्षित नंदीग्राम एक्सप्रेस उद्यापासून सुरु

### बल्हारशाह येथे हंसराज अहीर दाखविणार ट्रेनला हिरवी झेंडी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या सतत प्रयत्नामुळे व मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी व केंद्रीय रेल्वे मंत्र्यांच्या सहकार्याने ट्रेन नं. ११४०१/ ११४०२ नंदीग्राम एक्सप्रेस(मुंबई–आदिलाबाद) चा विस्तार बल्हारशाह स्थानकापर्यंत करण्यात आला असून ही एक्सप्रेस दि १६ मार्च २०२४ रोजी सकाळी ०८.३० वा. बल्हारशाह येथून मुंबई करीता रवाना होत असून या गाडीचा शुभारंभ हंसराज अहीर यांचे शुभहस्ते होणार असून ते या गाडीस हिरवी झेंडी दाखवून गाडीस रवाना करणार आहे.



नंदीग्राम एक्सप्रेस चा विस्तार बल्हारशाह पर्यंत झाला असल्याने मराठवाडा परिसरातील विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील शिख बांधवांना त्यांचे पवित्र तिर्थस्थान असलेल्या नांदेड येथील गुरुद्वाराचे दर्शन करण्यास मोठी सुविधा मिळाली आहे तसेच मराठवाड्यातील हजारो महाकाली मातेच्या भक्तांना या रेल्वेगाडीमुळे येण्या–जाण्याची सोय झाली आहे. सदर नंदीग्राम एक्सप्रेस बल्लारपूर, चंद्रपूर, भांदक, वणी, पिंपळखुटी, आदिलाबाद, मुदखेड, नांदेड, परभणी, पूर्णा, औरंगाबाद, जालना, मनमाड ते मुंबईस(छ. शिवाजी महाराज टर्मिनस) जात असल्याने चंद्रपूर, वणी(यवतमाळ) व परिसरातील प्रवाशांना मुंबईला जाण्याकरीता फार मोठी सोय होणार आहे. सदर ट्रेन ( विशेष ०१००२) दि १६ मार्च रोजी सकाळी ०८.३० वा बल्हारशाह येथून सुटणार असून १७ मार्च ला सकाळी ०५.३० वा. मुंबईला पोहचेल. या ट्रेनचे शुभारंभाचे दिवशी अग्रीम आरक्षण होणार नसून दि १७ मार्च पासून दररोज अग्रीम आरक्षण सुरु होईल जे यात्री दि १६ मार्च ला या ट्रेन ने मुंबई व अन्य ठिकाणी प्रवास करतील त्यांना टि.टि.ई. तिकीट उपलब्ध करतील.नंदीग्राम एक्सप्रेसच्या शुभारंभ व स्वागत समारंभास भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, रेल्वे यात्री संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरीक व प्रवाशांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या रेल्वे गाडीचे स्वागत करावे असे आवाहन भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उदयनराजेंनी स्वबळावर निवडणूक लढवावी:मराठा समाजाची मागणी, दुसऱ्या यादीत नाव नसल्याने कार्यकर्ते आक्रमक

**मुंबई (वृत्तसंस्था)** –भाजपने लोकसभा निवडणुकीची यादी जाहीर केली आहे. या यादीत भाजपकडून २० उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. अगदी रक्षा खडसे, पंकजा मुंडे, हीना गावित, स्मिता वाघ, नितीन गडकरी यांची नावे या यादीत आहेत. परंतु उदयनराजे भोसले यांचे नाव जाहीर केले नाही. त्यामुळे साताऱ्यातील उदयनराजे समर्थकांनी शिवतीर्थावर जमून आपली जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. साताऱ्याच्या पोवई नाका येथील शीवतीर्थावर मराठा समाज एकवटला होता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार घातल्यानंतर या कार्यकर्त्यांनी उदयनराजे भोसले यांच्या नावाने घोषणा दिल्या. उदयनराजे भोसले यांना उमेदवारी मिळालीच पाहिजे, अशी मागणी या कार्यकर्त्यांनी केली. उमेदवारी मिळत नसेल तर उदयनराजे यांनी स्वबळावर निवडणूक लढवावी, अशी मागणीही यावेळी कार्यकर्त्यांनी केली आहे.उदयनराजे हे सध्या राज्यसभेचे सदस्य आहेत. पण सातारा हा त्यांचा बालेकिल्ला आहे, असे असतांनाही साताऱ्याची सीट जाहीर न केल्याने उदयनराजे समर्थक अस्वस्थ झाले आहेत. या समर्थकांनी साताऱ्यातील शिवतीर्थावर जमून आपली जाहीर नाराजी व्यक्त केली आहे.राज्यातील या पहिल्या यादीत नव्या आणि जुन्यांचा



समावेश करण्यात आला आहे. पण उदयनराजे भोसले यांच्या नावाचा समावेश न करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. उदयनराजे भोसले यांना भाजपने तिकीट जाहीर न केल्याने मराठा समाज प्रचंड नाराज झाला आहे. मराठा समाजाचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले होते.भाजपच्या यादीत उदयनराजे भोसले यांचे नाव न आल्याने कार्यकर्त्यांनी काल रात्रीच राजीनामे तयार केले आहेत. पुढील काळात उदयनराजे यांचं नाव जाहीर न झाल्यास आम्ही पदांचे राजीनामे देऊ, असा इशाराच या कार्यकर्त्यांनी दिला आहे. उमेदवारी जाहीर न झाल्यास उदयनराजे यांनी स्वबळावर निवडणूक लढवावी, अशी आग्रही मागणीही कार्यकर्त्यांनी केली आहे. त्यामुळे उदयनराजे काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कठीण काळात भाजपला मदत, तरीही डावललं जातं:आठवलेंना उमेदवारी नाकारली तर बंड करू, रिपाइंचा भाजपला इशारा

**श्रीरामपूर (वृत्तसंस्था)** –भारतीय जनता पार्टीने शिर्डी लोकसभा मतदारसंघातून रामदास आठवले यांना उमेदवारी दिली नाही, तर जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघात अपक्ष उमेदवार देणार असल्याचा इशारा रिपाईने दिला आहे. भाजपकडे दोन लोकसभेच्या दोन जागांची मागणी करण्यात आली आहे. या दोन जागा न मिळाल्यास भाजपच्या विरोधात काम करणार असल्याचा इशाराही रिपाईने दिला आहे.

रिपाईने सोलापूर आणि शिर्डी या दोन लोकसभेच्या जागा मागितल्या आहेत. तर शिर्डीतून निवडणूक लढवणार असल्याची इच्छा गेल्या काही दिवसांपूर्वी रामदास आठवले यांनी व्यक्त केली होती. त्यामुळे शिर्डी आणि सोलापूरची जागा त्यांना मिळावी, अशी आशा रिपाईला आहे. मात्र यावर अद्यापही भाजपकडून काहीही प्रतिसाद मिळालेला दिसत नाही.रिपाईचे नेते विजय वाकचौरे म्हणाले की, नव्याने भाजपसोबत आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जर सन्मानपूर्वक जागा भाजपकडून मिळत असतील. तर आम्ही भाजपचा जुना मित्रपक्ष आहे. तर मग आम्हाला का डावललं जात आहे. आम्ही तर भाजपला त्यांच्या कठीण काळात सुद्धा मदत केली आहे, अशी खदखद वाकचौरे यांनी व्यक्त केली.लोकसभेसाठी शिर्डी व सोलापूर या दोन जागा देण्यात याव्यात. या दोन जागांच्या बदल्यात महायुतीला सर्व जागांवर विजयी करण्याची ताकद रिपाइंमध्ये आहे. शिर्डीतून आठवले यांना उमेदवारी मिळाल्यास भाजपचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच अन्य नेते त्यांना विजयी करू शकतात, असे वाकचौरे यांनी सांगितले.




# बाळाचे नाना रोगांपासून संरक्षण!

**जगभरात कोरोना महामारीने दहशत निर्माण केल्यानंतर लसीचे महत्व अधिक ठळकपणे दिसू लागले. पण हा लसीकरण दिवस खरंतर दि.१६ मार्च १९९५पासून सुरू झाला. कोरोना काळानंतर तर या दिवसाला अधिक महत्व दिले जाते.श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून या राष्ट्रीय लसीकरण दिनाचे महत्व जाणून घ्या.... संपादक.**



बाळ जन्मल्याबरोबर अर्ध्या तासात केलेले स्तनपान म्हणजे बाळाचे पहिले लसीकरण होय. चीक घट्ट दुधासारखा असतो. त्याचा रंग लिंबाच्या रंगासारखा पिवळसर हिरवा असतो. दुधामध्ये पहिले तीन ते सहा दिवस हा चीक असतो. चीकातील रोगप्रतिबंधक शक्तीमुळे बाळाचे अनेक रोगांपासून संरक्षण होते. उदा.जुलाब, सर्दी, खोकला, कान फुटणे, पोलियो, दमा इत्यादी आजारांपासून बाळाचा बचाव होतो. हा चीक पोटात गेल्यामुळे बाळाला शौचास साफ होते आणि पोटातील काळी घाण शौचावाटे आपोआपच बाहेर पडते. चीक जरी घट्ट असला तरी पचायला तो हलका असतो. या चीकामुळे आतड्यात पाचकरस तयार होण्यास मदत होते. चीक व दुधातील अन्न घटक बाळाला पोषकच ठरतात. बालकांमधील लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांचे प्रमाण व त्या आजारांमुळे होणारे मृत्यु कमी करण्यासाठी नियमित लसीकरण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. ऑक्टोबर १९७७मध्ये लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व क्षयरोग या पाच आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ''विस्तारित लस टोचणी कार्यक्रम–विलटो'' सुरु करण्यात आला. सन १९८५–८६मध्ये ''सार्वत्रिक लसीकरण'' कार्यक्रम सुरू करण्यात आला. गोवर लसीचा समावेश सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमामध्ये करण्यात आला आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमाच्या वेळापत्रकामध्ये हिपॅटायटिस बी या रोगाच्या लसीचा समावेश राज्यात सन २००८–०९मध्ये टप्याटप्याने करण्यात आला. आता ही लस सर्व जिल्हयांमध्ये लागू करण्यात आली आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमात जापनीज एन्सेफलायटिस या रोगाच्या लसीचा समावेश अमरावती महानगरपालिकासहीत यवतमाळ, नागपूर, भंडारा, वाशिम, गडचिरोली, लातूर आणि बीड जिल्ह्यात करण्यात आला. महाराष्ट्रात लसीकरणाच्या वेळापत्रकामध्ये सन २०११पासून गोवर लसीच्या दुसऱ्या मात्रेचा समावेश करण्यात आला.

लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांसाठी लहान बालकांचे लसीकरण, धनुर्वातासाठी गरोदर मातांचे लसीकरण सुरू झाले आहे. नियोजित सत्रांमध्ये लसीकरण करणे आरंभ झाला आहे. लसीची क्षमता टिकविण्यासाठी शितसाखळीचे व्यवस्थापन केले जाते. लसीकरणाची सुरक्षितता वाढविण्यासाठी सर्व



श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
दूरभाष– ७७७५०४१०८६.

जिल्हे व महानगरपालिका यांना एडी सिरिंजेसचा पुरवठा करण्यात येतो. जैविक वैद्यकिय कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यात येते. वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात येते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर अन्वेषण समित्यांची स्थापना होते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांची माहिती नोंदविण्यासाठी ''व्हिजीफलो'' या आंतरराष्ट्रीय ग्लोबल पोस्ट मार्केटिंग सर्व्हेलन्स ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर होतो. राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रम केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येतो. लसी तसेच सिरिंजेस शितसाखळी उपकरणे व अनुदान केंद्रशासनाकडून पुरविण्यात येते. लसीकरणासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दिलेल्या लसीकरणाच्या वेळापत्रकाचा वापर केला जातो. आरोग्य संस्था व बाह्यसंपर्काच्या ठिकाणी ठराविक दिवशी लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येते. लाभार्थीपर्यंत लस पोहचविण्यासाठी लसीची वाहतूक करताना शितसाखळीची गुणवत्ता अबाधित ठेवली जाते. आरोग्य व कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या लाभार्थींची नोंद लसीकरण रजिस्टरमध्ये करतात. लसीकरणाच्या सेवा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून लाभार्थींना विनामुल्य पुरविल्या जातात. लसींची शितसाखळी अबाधित ठेवण्यासाठी आईसलाईन्डम रेफ्रीजरेटर, डिपफ्रीजर, कोल्ड बॉक्स व्हॅक्सीन कॅरिअर, आईस पॅक, वॉक इन कुलर आणि फ्रीजर्स अशा उपकरणांचा वापर केला जातो. पल्स पोलिओ लसीकरण मोहिम ही राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम स्वरुपात संपुर्ण राज्यात व ठराविक जिल्ह्यासह सर्वच जिल्ह्यातील अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते. इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स– आईएपीने शिफारस केली आहे की ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना वर्षातून एकदा फ्लूची लस दिली पाहिजे. लसींच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. हा लसीकरण दिवस १९९५पासून सुरु झाला. वातावरण बदलले की मुलांना वाहणारे नाक, खोकला आणि हलका ताप यामुळे त्रास होतो. ही एक सामान्य सर्दी आहे आणि कालांतराने बरी होईल असे पालकांना वाटते. जेव्हा ताप जास्त असतो, मुलाला श्वास घेण्यास त्रास होतो आणि खोकला वाढतो तेव्हाच ते डॉक्टरकडे जातात. या प्रकरणात खरा धोका हा आहे की बर्याच वेळा ही लक्षणे सामान्य सर्दीची नसतात. हा फ्लू देखील असू शकतो. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे, की मुले इतर संक्रमित बालक किंवा प्रौढ व्यक्तीच्या संपर्कात आल्यावर त्यांना फ्लूची लागण होऊ शकते. मुलांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने ते संसर्गाला लगेच बळी पडतात. म्हणून मुलांना दरवर्षी फ्लूची लस देणे आवश्यक आहे.

जगभरात कोरोना महामारीने दहशत निर्माण केल्यानंतर लसीचे महत्व अधिक ठळकपणे दिसू लागले. पण हा लसीकरण दिवस खरंतर दि.१६ मार्च १९९५पासून सुरू झाला. कोरोना काळानंतर तर या दिवसाला अधिक महत्व दिले जाते. राष्ट्रीय लसीकरण दिनानिमित्त या दिनाचे महत्व जाणून घेउया. राष्ट्रीय लसीकरण दिवस दरवर्षी दि.१६ मार्च रोजी साजरा केला जातो. देशात दि.१६ मार्च १९९५ रोजी तोंडावाटे पोलिओ लसीचा डोस सुरू करण्यात आला. या दिवसाने संपूर्ण देशात लसींच्या महत्त्वाविषयी जनजागृती केली. म्हणून हा दिवस भारत सरकारच्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी साजरा केला जातो. देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी हा सरकारचा पुढाकार होता. कार्यक्रमानुसार ० ते ५ वर्षे वयोगटातील मुलांना पोलिओचे दोन थेंब दिले जातात. जगात पोलिओ निर्मूलनासाठी दोन महत्त्वाच्या लसीकरण पद्धती वापरल्या जातात. पहिली पद्धत जोन्स साल्क यांनी सन १९५२ साली यशस्वीरित्या शोधून काढली. या पद्धतीत लस म्हणजे मेलेल्या जीवाणूंचा संच वापरला गेला. हे जीवाणू शरीरात स्नायूमार्फत टोचून दिले जात. नंतर अल्बर्ट सबिन यांनी मुखामार्गे लसीकरणाची पद्धत शोधून काढली. पोलिओचे जीवाणू कोणत्याही प्राण्याच्या शरीरामध्ये फार वेळ राहू शकत नाहीत कारण त्या प्राण्याची रोग प्रतिकार शक्ती त्या पोलिओ विषाणूंना पळवून लावते व त्यामुळे पोलिओचे कायम स्वरूपी निश्चित असे वाहक निसर्गात नाहीत. या गोष्टीमुळे आपल्या हे लक्षात आले कि मनुष्यांतर्गत पोलिओ विषाणूंचा होणारा प्रसार रोखणे, ही जागतिक पोलिओ निर्मुलनातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. अशा या दोन लसीकरण पद्धतींचा अवलंब केल्यामुळे आज जगातील सगळ्या देशांमध्ये पोलिओ रुग्णांची संख्या कमी झालेली आहे. याचा पुरावा हा कि गेल्या २० वर्षांमध्ये साडे तीन लाखापासून दीड हजार रुग्णांपर्यंत पोलिओमध्ये घट झालेली आहे.

!! राष्ट्रीय लसीकरण दिनाच्या सर्व बालकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# उक्कलगाव जिल्हा परिषद शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मौ. उक्कलगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आज स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्ग आठवीतील सर्व विद्यार्थी यावेळी शाळेमध्ये शिक्षक स्वरूपात दाखल झाले होते शाळेचे वर्ग पाचवी ते आठवीचे मुख्याध्यापकपद शाळेची विद्यार्थीनी कुमारी विद्या रामेश्वर पिंपळे व वर्ग पहिली ते चौथीचे मुख्याध्यापक पद कुमारी अंकिता अंकुश पिंपळे तर उपमुख्याध्यापक म्हणून कुमारी वर्षा अच्युतराव उक्कलकर या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट रित्या जबाबदारी स्विकारून ती ऊत्तम रित्या पार पडली वर्ग पहिली ते आठवी च्या प्रत्येक वर्गावर कोणता विषय कोणी शिकवायचा याचे योग्य नियोजन शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती अलका सातपुते यांनी तयार करून



दिले. शाळेतील सर्व विद्यार्थी वर्गात येऊन शिकवणाऱ्या शिक्षकांना ही छान असा प्रतिसाद देत होते विद्यार्थ्यां मध्ये सभाधिटपणा, सामंजस्य व नेतृत्व गुण यावा या साठी हा उपक्रम शाळेमध्ये घेण्यात येत असतो जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मायादेवी गायकवाड व शाळेतील सर्व शिक्षक बंधू – भगिनीनी वर्ग इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कौतुक केले दरम्यान आपल्या पेक्षा वयाने मोठे असलेल्या विद्यार्थ्यांचे आपण ऐकले पाहिजे ही भावना या वेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या मना मध्ये निर्माण झाली व स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहासह आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रयत्न करूण परिश्रम घेतले.

# बीड लोकसभा विजयासाठी पंकजाताईंना भाजपा महायुतीच्या नेत्याकडून शुभेच्छा

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची काल उमेदवारी जाहीर करण्यात आली. पंकजाताईंच्या उमेदवारीमुळे संपूर्ण जिल्हाभरात भाजपा व महायुतीच्या घटक पक्षातील नेते कार्यकर्ते यांच्याकडून उमेदवारीचे स्वागत केले जात आहे.

आज दुपारी वरळी मुंबई येथील कार्यालयात पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांची भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ. सुरेश आण्णा धस, माजी आमदार भीमराव धोंडे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल दादा जगताप, कुंडलिक खांडे, जयदत्त धस, सुरेश उगलमुगले यांनी भेट घेऊन लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शरद




दुग्गड, चेअरमन कल्याण पवार आदी उपस्थित होते.जनसंपर्कातील खंबीर नेतृत्व म्हणून पंकजाताई मुंडे यांचे नाव जिल्ह्यासह राज्यभरातील जनसामान्यापर्यंत पोहोचलेलं आहे.तुल्यबळ उमेदवार बीड लोकसभा रिंगणात महायुतीकडून आल्याने भारतीय जनता पार्टीच्या विजयाची हॅट्रिक होणार असल्याचे स्पष्ट चित्र निर्माण झाले आहे.

# अधिमुल्याचा प्रस्ताव रद्द करा;जिल्हाधिकारी यांचे चार दिवसात मार्ग काढण्याचे आश्वासन

**सेलू । प्रतिनिधी**

माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या नेतृत्वात सेलू येथील व्यापाऱ्यांनी परभणी जिल्हाधिकारी श्री. गावंडे यांना गुरूवारी (ता.१४) रोजी निवेदन सादर केले.सदरील निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, नगर परिषद सेलू जिल्हा परभणीची शहरातील मोकळ्या जागा व गाळे वरील अवाजवी केलेले भाडेवाढ व अधीमूल्य प्रस्ताव तात्काळ रद्द करण्यात यावा. ही प्रमुख मागणी करण्यात आलेली आहे. नगर परिषद सेलू ने मालमत्तेतील शहरातील एकूण अंदाजे ९७५ गाड्यांचे व मोकळ्या जागेचे भाडे निश्चित करून अधिमूल्य ठरवण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय पाठवून शहरातील गाळ्यांचे व मोकळ्या जागेचे अवाजवी भाडे निश्चित करून मोठ्या प्रमाणावर दोनशे ते तीनशे टक्के भाडेवाढ व प्रत्येक गाळे मोकळी जागा धारकाला आवाच्या सव्वा दराने लाखो रुपयांचे आदी मूल्य ठरविण्यात आली आहे. त्याचा मोठ्या प्रमाणात उदंड सामान्य नागरिक तसेच व्यापारी वर्गाला भविष्यात बसणार आहे. अगोदरच कोरोना महामारी संकटातून बाहेर निघालेल्या व मोठ्या आर्थिक अडचणीत असलेल्या सर्वसामान्य व व्यापारी अजूनही सावरलेला नाही. ही प्रचंड जुलमी भाडे वाढ व लाखो रुपये अधिमूल्य निश्चित करून व्यापाऱ्यांना देशोधडीला लावून त्यांचे कुटुंब रस्त्यावर आणण्याचे हे काम नगर परिषद सेलू ने पाठविलेल्या प्रस्तावातून दिसत आहे त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण तयार झाले आहे. यामुळे व्यापारी व त्यांच्या कुटुंबामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. विशेष भाग म्हणजे शहरातील सर्वच गाळे व मोकळी जागा



धारक यांना कुणाला कमी कुणाला जास्त प्रमाणात प्रमाणात भाडेवाढ व आधीमुल्य लावलेले आहेत. याबाबत सर्व दुकानदार भाडेकरूंना विश्वासात घेऊन व चर्चा करून थोड्याफार प्रमाणात भाडे वाढ करावी व कुठलीही अधिमुल्य लावू नये सदरील प्रस्ताव मध्ये परभणी जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून हा प्रस्ताव रद्द करून सेलू शहरातील अंदाजे ९७५ व्यापारी व त्यांच्या कुटुंबांचा म्हणजे जवळपास ५००० व्यक्तींचा सहानुभूती विचार करून योग्य ती निर्णय घ्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनावर भाजप शहराध्यक्ष अशोक अंभोरे, धनराज गादीया, आनंद जाधवानी, विठ्ठल कोकर, नारायण बालचंदाणी, सन्नी कुकरेजा, प्रसाद शिकारे,गिरीश गुरबानी, विशाल संघई,नागोराव देशमुख,रमेश शिकारे,मीर आलम, कवडे पाटील,संतराम कास्टे,दीपक दायमा,नीरज लोया, सुरकांत जाधव , जॉली बब्बर,शेख रज्जाक, शाम दळवे,विठ्ठल कोकरे, रियाज भाई गफार भाई यांनी हे निवेदन दिलेयावेळी माननीय जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक विचार करून तीन ते चार दिवसात मार्ग काढून असे आश्वासन मा. आ. रामप्रसाद बोर्डीकर व व्यापाऱ्यांना दिले आहे आहे.

# धान खरेदी चुकारेसंदर्भात खरेदी केंद्रावर बँक मॉडीफिकेशनची सुविधा

**चंद्रपूर**–धान खरेदी नंतर तांत्रिक कारणामुळे चुकारे प्राप्त न झालेल्या शेतक–यांसाठी खरेदी केंद्रावर बँक मॉडीफिकेशनची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित शेतक–यांनी त्वरीत धान खरेदी केंद्रावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी व्ही. एस. तिवाडे यांनी केले आहे.हंगाम २०२३–२४ मधील आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत जिल्ह्यात धान व भरडधान्य खरेदी करण्यात आले आहे. धान व भरडधान्य खरेदी करण्यात आलेल्या शेतक–यांचे चुकारे ऑनलाईन पध्दतीने छशचङ पोर्टलवरून झत्र्चड प्रणालीद्वारे अदा करण्यात येतात. तसेच छशचङ पोर्टलवर शेतकरी नोंदणी करतांना धान खरेदीदार सबएजंट संस्थाकडून शेतक–यांचे बँक खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड व इतर योग्य माहिती न घेतल्यामुळे शेतकरी चुकारे अदा करतांना अडचणी निर्माण होत आहे. अशा अडचणीमुळे शेतक–यांना चुकारे अदा करण्यास विलंब होत आहे.खरेदी केलेल्या धान व भरडधान्याचे काही शेतक–यांचे, खरेदी कालावधीमध्ये तसेच खरेदी नंतर काही बँकेचे आय.एफ.एस.सी. कोड मध्ये बदल झाला असल्याने शेतकरी चुकारे परत येत आहे. तसेच ज्या शेतक–यांचे चुकारे अदा करतांना चुकीचे बँक खाते क्रमांक, चुकीचे आय.एफ.एस.सी. कोड, डुप्लीकेट एन्ट्री, पेमेंट होल्ड रजिस्ट्रेशन न होणे, फ्रिज खाते व संयुक्त खाते तसेच बँकेच्या काही तांत्रिक अडचणीमुळे चुकारे शेतक–यांच्या खात्यात जमा झाले नाही. त्यामुळे १४ मार्च २०२४ पासून छशचङ पोर्टल बँक मॉडिफिकेशन करीता पुढील एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

# नियोजन विभागातुन मतदार संघातील विविध विकास कामांसाठी १५ कोटींचा निधी मंजूर

**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर मतदार संघातील विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून काही कामे पूर्ण झाली तर काही विकास कामे पुर्णात्वाकडे जात आहेत. त्यातच मतदार संघातील उर्वरीत कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असुन उदगीर व जळकोट मतदार संघातील विविध कामांसाठी तब्बल १५ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कागे व नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कागे या योजनांना वाचा येथील अनुक्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून त्याअंतर्गत करावयाच्या कामांसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. नियोजन विभागातुन उदगीर व जळकोट मतदार संघातील कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला असुन त्यामध्ये उदगीर शहरातील पत्रकार भवन बांधकामांसाठी ४ कोटी रु, सिध्दरामेश्वर मंदीर, उदगीर विकसीत करणे १ कोटी, ईदगाह मैदान, उदगीर येथे कंपाऊंट वॉल करणे १ कोटी रु, शहरातील रेणुकाचार्य संस्कार भवनाच्या उर्वरीत बांधकामासाठी १ कोटी, उदगीर येथील गवळी समाज स्मशानभुमी येथील उर्वरीत काम करण्यासाठी २० लक्ष रु, सहजीवन सोसायटी, उदगीर येथील गार्डन विकसीत करण्यासाठी २० लक्ष रु., उदगीर येथील रोकडे हनुमान मंदीर कडे जाणारा उर्वरीत रस्ता सिमेंट कॉक्रीट करण्यासाठी ५० लक्ष रु, उदगीर शहरातील शाहू चौक ते कल्पना टॉकीज



चौक पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे व रस्ता दुभाजक करणे ५० लक्ष रु., म.फुले नगर, उदगीर येथे वडार समाजाचे सभागृह बांधकाम करण्यासाठी ३० लक्ष रु, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, उदगीर येथील सुशोभिकरण व उर्वरित काम करण्यासाठी ५० लक्ष रु., पारकट्टी गल्ली, उदगीर येथे चौकीमठ बांधकाम करण्यासाठी १ कोटी रु., उदगीर येथील प्रभाग क्र. ०७ येथे शाह सैलानी दर्गा येथे सुशोभिकरण करणे उदगीर येथील गणेश मंदीर समतानगर, वरील मजला सुशोभिकरण करणे २५ लक्ष रु., जयवीर हनुमान मंदीर, रघुकूल मंगल कार्यालयासमोर उदगीर सभागृहाचे उर्वरीत बांधकाम करणे २५ लक्ष रु., गणेश मंदीर, उदगीर नई अबादी परिसर येथे सुशोभिकरण करणे २५ लक्ष रु., उदगीर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर अशोक स्तंभ उभा करण्यासाठी ५० लक्ष रु.,उदगीर येथील जिजामाता मंदीर परिसर सुशोभिकरण व विकसीत करणे २० लक्ष रु., उदगीर येथे १३५ मीटर उंचीचा राष्ट्रध्वज उभारणी करण्यासाठी ६० लक्ष रु., उदगीर येथे मुसा नगर प्रभाग क्र. १० मध्ये सभागृह पहिला मजला व सुशोभिकरण करणे ५० लक्ष रु., जळकोट शहरातील मराठा भवनचे उर्वरीत बांधकाम करण्यासाठी १ कोटी रु., जळकोट शहरातील श्री राम मंदीर बांधकाम करणे ५० लक्ष रु., लिंगायत भवन जळकोट येथे उर्वरित इलेक्ट्रिक काम करण्यासाठी २० लक्ष रु., जळकोट शहरातील बौध्द विहार येथे उर्वरित इलेक्ट्रिक काम करण्यासाठी १५ लक्ष रु., जळकोट शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सभागृह येथे उर्वरित इलेक्ट्रिक काम करण्यासाठी १५ लक्ष रु., असे एकुण १५ कोटी रुपयाचा निधी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी मंजूर केला आहे. सदर निधी मंजूर केल्याबद्दल मतदार संघातील नागरिकांनी ना.संजय बनसोडे यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

## विद्यापीठाच्या अधिसभेची वार्षिक सभा

# गोंडवाना विद्यापीठाच्या ४८२ कोटी रुपयाच्या अर्थसंकल्पास मान्यता

**गडचिरोली । प्रतिनिधी**

विद्यापीठाचे आर्थिक नियोजन, विद्यमान आणि भविष्यातील शैक्षणिक योजना याबाबत अधिसभा हे विद्यापीठाचे प्रमुख प्राधिकरण असून विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी अनेक कल्याणकारी व विद्यार्थी हिताच्या योजना राबविल्या जातात. गोंडवाना विद्यापीठ येथे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेच्या वार्षिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या अधिसभेमध्ये विद्यापीठाच्या आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या ४८२ कोटी रुपयाच्या मुळ अर्थसंकल्पास मान्यता देण्यात आली.




सभेला गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन उपस्थित होतेगोंडवाना विद्यापीठाचे आर्थिक वर्ष २०२३-२४ चे सुधारीत व आर्थिक वर्ष २०२४-२५चे मुळ वार्षिक अर्थसंकल्प महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये तसेच महाराष्ट्र विद्यापीठ समान लेखा संहिता-२०१२ तरतुदीच्या अधिन राहून चार भागात तयार करण्यात आला आहे. यामध्ये भाग-१ परिपालन खाते, भाग-२ विकास खाते, भाग-३ स्वतंत्र प्रकल्प, योजना, सहभागी उपक्रम आदी खाते तर भाग-४ आदर्श पदवी महाविद्यालय आदींचा समावेश आहे.आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पात ४८२ कोटी रुपयाचे आगम येणे अपेक्षित असून ५१० कोटी रुपयांचे शोधन अपेक्षित आहे. म्हणजेच, २८ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प आहे.

**अर्थसंकल्पात विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालय व समाजाच्या विकासाकरीता तरतुद:**

गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देत त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याची जबाबदारी विद्यापीठाची आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालय व समाजाच्या विकासाकरिता तरतुदी करण्यात आल्या आहेत.विद्यार्थी विकास विभागातंर्गत कमवा व शिका योजनेकरीता ३० लक्ष, वीर बाबुराव शेडमाके कमवा व शिका उद्योजक योजनेकरीता ५० लक्षाची तरतूद करण्यात आली आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागातंर्गत मूळ अर्थसंकल्पात क्रीडा अकॅडमीकरीता ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच पदवीधर विभागांतर्गत प्रयोगशाळेकरीता १ कोटी २५ लक्षाची तरतूद, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागातंर्गत लघु संशोधन प्रकल्प योजनेकरीता ३५ लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

**विद्यापीठास राज्य, केंद्र शासन व इतर प्रकल्पाच्या माध्यमातून या बाबींवर होणार अनुदान अपेक्षित:**

विद्यापीठाचे न्याय नामांकन झाल्यामुळे विद्यापीठात पीएम उषा अंतर्गत रु. १०४ कोटीचा निधी, अडपल्ली परिसर विकासासाठी राज्य शासनाकडून अंदाजीत रुपये ६५ कोटी, चंद्रपूर उपकेंद्र परिसर विकासासाठी अंदाजित रु. २२ कोटी, जनसंवाद प्रयोगशाळेकरिता अंदाजीत रू. ९.६१ कोटी, कौशल्य विकास कार्यक्रमाकरिता अंदाजीत रु. १६ लाख, येणाऱ्या आर्थिक वर्षात प्राप्त होणार आहे. कौशल्य विकास अंतर्गत सी.आय.आय.आय.टी साठी विद्यापीठ परिसरात रुपये १७० कोटींची गुंतवणूक या आर्थिक वर्षात होणार आहे. अल्फा अकॅडमी प्रकल्पांतर्गत अंदाजीत रुपये १.६० कोटी,जिल्हा नियोजन प्रशासनाकडून सोलर सिस्टीम प्रकल्पाकरिता अंदाजीत रुपये १.१ कोटीचा निधी, तसेच परीक्षा उपकरणांसाठी अंदाजित रुपये १.५ कोटी, प्रशिक्षण केंद्रासाठी या आर्थिक वर्षात रुपये ४ कोटीचा निधी, छखएझ- अंतर्गत रुपये ३ लाख रुपये, ढठखउएक्र अंतर्गत रु. २५ लाख, तर ढठढख अंतर्गत रुपये २५ लाख रुपये इतका निधी या आर्थिक वर्षात प्राप्त होणार आहे. तसेच एकल प्रकल्पांतर्गत रुपये ३ कोटीचा निधी या आर्थिक वर्षात प्राप्त झाला आहे. आदिवासी अध्यासन केंद्राकरिता रुपये ३ कोटी प्राप्त झाले आहे. अल्फा अकॅडमी प्रकल्पांतर्गत प्रयोगशाळेकरीता रु. ७६ लाख या आर्थिक वर्षात प्राप्त झाले आहे.

**विद्यापीठात कार्यान्वित विविध अध्यासन केंद्र:**

विद्यापीठामध्ये सुरू असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीता अध्यासन केंद्र, आदिवासी अध्यासन केंद्र, जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्र, एकात्म मानवतावाद अध्यासन केंद्र, वामनदादा कर्डक अध्यासन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व महात्मा फुले अध्यासन केंद्र या अध्यासन केंद्राना आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात आदिवासी अध्ययन केंद्राकरीता रु. २५ लक्ष व इतर अध्यासन केंद्रास प्रत्येकी १० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# जिवती येथे तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद संपन्न

**जिवती । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, मातृ संस्था स्टापी पुणे व प्रकृती महिला विकास केंद्र चंद्रपूर द्वारा 'कम्युनिटी क्शन फॉर हेल्थ' या कार्यक्रमांतर्गत जिवती येथे तालुकास्तरीय जनसंवादाचे आयोजन करण्यात आले.



जनसंवादात हेमंत भिंगारदेवे गट विकास अधिकारी, डॉ.अविष्कार खंडारे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.स्वप्निल टेंभे तालुका आरोग्य अधिकारी, बालाजी वाघ सी.ए.एच. प्रकल्प अधिकारी, निलेश देवतळे जिल्हा समन्वयक, वैद्यकीय अधिकारी डॉ.गजेंद्र अहिरकर, डॉ.कविता शर्मा, डॉ.आबीद शेख, अक्षय देशमुख जिल्हा क्षेत्र पर्यवेक्षक, गणेश चिंतकुटलावर फेल्लो आकांशीत तालुका कार्यक्रम, आरोग्य विस्तार अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, तालुका समन्वयक संभाजी ढगे, मंगला घटे, अरुणा खोब्रागडे, तालुक्यातील सरपंच, ग्रा.पं.सदस्य, आशा पर्यवेक्षिका, अं.सेविका, आशा वर्कर, ग्राम आरोग्य दूत, बचत गटातील महिला, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.जनसंवादाचे प्रस्ताविक, प्रकल्पाची ओळख व भूमिका निलेश देवतळे यांनी केले, जनसंवाद कार्यक्रमाचे संचालन व पार्श्वभूमी अक्षय देशमुख यांनी मांडली तर डॉ. अविष्कार खंडारे यांनी जनसंवाद कार्यक्रम प्रत्येक तालुक्यात घ्यायला पाहिजे जनसंवादातून बरेच प्रश्नाचे निराकरण होतात यामुळे नागरिकांना समाधान मिळते असे मनोगत व्यक्त केले. स्वप्निल टेंभे यांनी जनतेला आरोग्यविषयक प्रश्नांना सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन सहकार्य करावे असे मत व्यक्त केले.बालाजी वाघ यांनी ग्रामसभा यशस्वी करून ग्रामस्थांनी आरोग्यविषयक निधीचे नियोजन करावे ज्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागू शकते असे मत व्यक्त केले.सदर जनसंवाद कार्यक्रमात ग्रामस्थांनी गावातील व तालुक्यातील आरोग्य, रोजगार, स्वच्छता, शिक्षण, बांधकाम, संदर्भ सेवा, रस्ते, पाणी, रिक्त पदे इत्यादी विविध विषयावरील प्रश्न उपस्थित केले. कार्यक्रमाचे आभार संभाजी ढगे यांनी मानले.

# वंचितांच्या विकासासाठी प्रधानमंत्री सुरज पोर्टल महत्त्वाचे-हंसराज अहिर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

समाजातील वंचित लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी गाव पातळीवरील शासकीय यंत्रणेसह डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर हा आर्थिक मोलाचा ठरला आहे. केंद्र शासनाने त्या दृष्टीने अधिक सुलभतेसाठी प्रधानमंत्री सामाजिक उत्थान रोजगार आधारित जनकल्याण पचे लोकार्पण केले असून हे प अधिक मोलाचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी 'प्रधानमंत्री सुरज' या राष्ट्रीय पोर्टलचे दूरदृष्यप्रणाली द्वारे लोकार्पण करण्यात आले. यानिमित्त वन अकादमी चंद्रपूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर सामाजिक न्याय व अधिकारी का मंत्रालय नवी दिल्लीचे अवर सचिव राकेश कुमार, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब देशमुख, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक मुकेश बारमासे उपस्थित होते.सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय अंतर्गत भारतातील प्रमुख शहरात दूरदृष्यप्रणाली द्वारे देशव्यापी शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले. यावेळी वन अकादमी येथे विविध लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात आयुष्यमान कार्डचे वाटप तसेच अपंग व्यक्तींना विवाह आर्थिक सहाय्य म्हणून प्राथमिक स्वरूपात नऊ जणांना २५ हजार रुपये प्रमाणे धनादेश वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी तर आभार सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बाबासाहेब देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

# गडचिरोली जिल्ह्यात दारूची अवैध वाहतूक करताना चंद्रपूरच्या युवकाला गोंडपिपरीत अटक




**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**

चंद्रपूर -गडचिरोली जिल्ह्याला जोडणारी सीमा गोंडपिंपरी तालुका असून या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात गडचिरोली जिल्ह्यात दारू तस्करी होत असते.गडचिरोली जिल्ह्यात दारू बंदी असल्याने मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यात तरुणाई उतरलेली पाहायला मिळत आहे.अशातच दि १४ गुरुवारी छत्रपती शिवाजी चौक गोंडपिपरी येथे चंद्रपूरच्या युवकाला दारूची अवैध वाहतूक करताना अटक करण्यात आली.

गोंडपिपरी मार्गे गडचिरोली जिल्ह्यात आरोपी प्रकाश विजय बर्वेकर वय ३३ सिद्धार्थ नगर चंद्रपूर हा चक ०५ उक १६९९ या चारचाकी वाहनाने दारू वाहतूक करत असल्याची माहिती पिएसआय मनोहर मोगरे यांना मिळाली ठाणेदार रमेश हत्तिगोटे यांच्या मार्गदर्शनात मोगरे यांनी सहकारी पोलीस गौरकर,पवार यांना सोबत घेत रात्री १ वाजता शिवाजी चौकात गाडी अडवून चौकशी केली असता दारू सापडली.आरोपीला अटक करून ४ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त करत आरोपी विरुद्ध गोंडपिंपरी पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

# राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न उराशी बाळगत भाजपाची वाटचाल-ना.मुनगंटीवार

## काँग्रेस पक्षाला कंटाळत काँग्रेसच्या ५९३ कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील काँग्रेसच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीच्या विचारांचा स्वीकार करीत व विकासाच्या झंझावाताचे समर्थन करीत पक्षात प्रवेश केला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.



१२ मार्च २०२४ रोजी भद्रावती येथे काँग्रेसच्या ५९३ कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे राष्ट्रनिर्माण करणारी आहेत. प्रगतीच्या दिशेन घेऊन जाणारी आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टीचा विचार प्रत्येक नागरिकापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य करणार आहात. त्यामुळेच आपण भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. सर्वांचे भारतीय जनता पार्टीत स्वागत आहे, असे ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे , माजी जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, चंदुजी गुंडावार, रमेश राजुरकर, नरेंद्र जिवतोडे, प्रविण सातपुते, संतोष आमणे, प्रविण सातपुते, संतोष आमणे, किशोर गोवारदिपे, रुपेश मांडरे, संतोष नागपूरे, प्रविण नागपूरे, विजय वानखेडे, अमित गुंडावार, इमरान शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश घेतला.भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये काँग्रेसचे मुख्य नेते सिकंदर शेख व पप्पू शेख यांच्यासोबत इस्माईल शेख, सूरज पेंदाम, प्रीतम देवतळे, प्रफुल्ल भोस्कर, योगेश नागपुरे, वैभव मेश्राम, प्रवीण सिंग, शाहिद सय्यद, अभिषेक घुबडे, उत्तम पोईनकर, विकी सोनुने, संकेत सातपुते, प्रशांत लांडगे, जुनेद खान, अथर्व भाके, आकाश नागपुरे, पवन नागपूर, शैलेश वाभिटकर, अमित घोडमारे, दीपक कुळमेथे, अनिल रुयारकर, ऋतिक जाधव, कुणाल बटरवाल, आवेश सय्यद, प्रफुल्ल वानकर, राजू किन्नाके, ऋतिक माकोडे, आतिश डोंगरे, चंद्रभान नागोसे, बंडू ढेंगळे, देवराव टेकम, सुधीर ठाकरे, नरेश त्रिवेदी, नितेश मेहता, सागर सदमवार, अक्षय सदमवार, गणेश पचारे, विनोद कुमार, विनोद प्रसाद, रोहित यदुवंशी, मनोज चौधरी, शाहरुख शेख, सलाउद्दीन सिद्दीकी, आमिर शेख, अय्युब खान, सूरज दुर्गे, सूरज पिंपळशेंडे, गौरव माडी, किशोर चौधरी, सिकंदर गोतकोंडावार आदींचा समावेश आहे.

# श्रीकांत शिंदेंना लोकसभेची उमेदवारी जाहीर करण्याचा अधिकार नाही-छगन भुजबळ

**मुंबई**-खासदार श्रीकांत शिंदे यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर करण्याचा अधिकार नाही, ते हेंमत गोडसे यांची उमेदवारी कशी जाहीर करु शकतात, म्हणून भाजपकडून विरोध होणे स्वाभाविक आहे, असे मत अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, महायुतीची काहतरी शिस्त आहे. ती सर्वांनी पाळली पाहिजे, श्रीकांत शिंदेंना उमेदवारी जाहीर करण्याचा अधिकारच नाही ते अशी उमेदवारी कशी जाहीर करु शकतात असा सवाल भुजबळांनी उपस्थित केला आहे.

# भेजगाव येथे महिला दिनानिमित्त सांस्कृतिक महोत्सव

**मुल । प्रतिनिधी**

तालुक्यातील भेजगाव येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियाना अंतर्गत असलेल्या एकता व समता ग्राम संघाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक १३ ला ग्रामपंचायत सभागृहात सांस्कृतिक महोत्सव पार पडला.



सदर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी सरपंच अखिल गांगरेड्डीवार तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या सीमा लोणबले तर विशेष अतिथी म्हणून उमेद प्रकल्पाचे तालुका व्यवस्थापक नितीन वाघमारे माजी सभापती प्रकाश गांगरेड्डिवार, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा विजय लोणबले,पोलीस पाटील शशिकांत गणवीर,स्नेहल मडावी, अंगणवाडी सेविका निमाताई शेंडे, रश्मी गांगरेड्डिवार,शुभांगी गणवीर, जयश्री चौधरी आदी मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमात मान्यवरांनी उमेद अभियानांतर्गत शासकीय योजनांचा लाभ घेत स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर व्हावे.घरातील कर्त्या पुरुषांसोबतच व्यवसायात पुढे जात आर्थिक साक्षर होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांनी सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त होत महिलांना व्यासपीठ मिळावं म्हणून सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन महिलांनी केले होते. यात शेकडो महिलांनी सहभाग नोंदविला यावेळी गावातील बचत गटाच्या शेकडो महिला उपस्थित होत्या कार्यक्रमाचे यशस्वी संचालन सारिका बावणे तर प्रास्ताविक शरयु वाढई तर आभार विशाखा गणवीर यांनी मानले.

# विद्यार्थी कौशल्य आधारित प्रशिक्षणातून जिल्ह्याच्या विकासात हातभार लावेल-मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह








**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ व जिल्हा प्रशासन, गडचिरोलीच्या वतीने महत्त्वपूर्ण व नाविण्यपुर्ण उपक्रम विद्यापीठातंर्गत राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षण व कौशल्याधारित प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. अल्फा अर्कडमी व सी.आय.आय.आय.टी प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच येथील विद्यार्थी कौशल्य आधारित प्रशिक्षणातून जिल्ह्याच्या विकासात हातभार लावेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी व्यक्त केला.

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने अल्फा अर्कडमीमधील पहिल्या सत्रातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम तसेच सेंटर फॉर इनव्हेंशन, इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड ट्रेनिंग या संकल्प प्रकल्पाअंतर्गत प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटन समारोहाप्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी, गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत मोहिते, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सह आयुक्त योगेंद्र शेंडे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन, अल्फा अर्कडमीचे नोडल अधिकारी डॉ. कृष्णा कारू आदी उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह म्हणाल्या, तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना यांनी या प्रकल्पाकडे विशेष लक्ष दिले व आज पहिली बॅच पूर्ण होत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. डिजिटल क्षेत्रात विद्यार्थ्यांना भविष्यात चांगल्या संधी चालून येतील. नाविन्यपूर्ण संकल्पना व उपक्रम जिल्ह्यात राबविल्याबद्दल गोंडवाना विद्यापीठाचे अभिनंदन केले. यापुढेही असे उपक्रम विद्यापीठाने राबवावे. प्रशासन सर्वतोपरी मदत करेल, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह म्हणाल्या. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे म्हणाले, महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाला असलेला, दुर्गम व आदिवासी बहुल जिल्हा अशी गडचिरोली जिल्ह्याची ओळख आहे. या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित शिक्षण देणे या विद्यापीठाचे ध्येय, उद्दिष्ट आणि कर्तव्य आहे. अल्फा अर्कडमीची सुरुवात गोंडवाना विद्यापीठ व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना व कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या संकल्पनेतून झाली. विद्यापीठांतर्गत सी.आय.आय.आय.टी केंद्राच्या माध्यमातून १ हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येत आहे तर अल्फा अर्कडमीच्या माध्यमातून ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत असून कोडींगचा लाभ येथील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना होत आहे.अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील म्हणाले, गडचिरोली जिल्हा विकासाच्या दृष्टीने प्रगतीपथावर येत आहे. कौशल्य असलेले तज्ञ कामगार व अधिकारी असतील तर जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागेल. येथील विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण घेण्यासाठी मुंबई पुणे यासारख्या शहरात जावे लागत होते. मात्र, अल्फा अर्कडमी आणि सी.आय.आय.आय.टी केंद्राच्या माध्यमातून येथील तरुणांना कौशल्य आधारित प्रशिक्षण जिल्ह्यातच मिळत आहे. येथील तरुणांना इतर जिल्ह्यातही रोजगार प्राप्त होण्यास मदत मिळेल असे ते म्हणाले.प्रस्ताविकेत बोलतांना अल्फा अर्कडमीचे नोडल अधिकारी डॉ. कृष्णा कारू म्हणाले, मागील सहा महिन्यापासून हा प्रकल्प कार्यान्वित आहे. आतापर्यंत ५०० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून तालुकास्तरावर १२ विद्यार्थ्यांची जिल्हा प्रशासनाकडून निवड करण्यात आली आहे.तत्पूर्वी इंटरनॅशनल सॉफ्ट स्किल ट्रेनर रवींद्र मिसाळ यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास तसेच जीवनात यशस्वी होण्याबाबत उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

### पहिल्या सत्रातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण

नवनाथ कन्नाके, संजना वाडणवार, रोहित कुमरे, अंजुम शेख, मयूर कोरवते, वैष्णवी शिलार, आयुषी मस्के, रुपेश वासेकर, गौतमी सहारे, दीक्षा रायपुरे या प्रशिक्षणार्थीना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## उद्योजक दिव्यांगांचा सत्कार सोहळा

# आत्मसन्मान मिळवायचा असेल तर आत्मनिर्भर होणे गरजेचे-संगीता तुमडे



**तळोधी (बा ) । प्रतिनिधी.**

प्रहार दिव्यांगमंच तळोधी (बॉ)व परिसर संघटना, संघर्ष दिव्यांग सेवा जणपरिसर संघटना मिंडाळा आणि संकल्प दिव्यांग जनपरिसर संघटना गांगलवाडी यांच्या संयुक्त सहभागाणे दिनांक १४मार्च २०२४ ला हनुमान देवस्थान गायमुख इथे दिव्यांगाचा सामुहिक स्नेहमीलन सोहळ्यात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन उद्योजक दिव्यांगाचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

दिव्यांग व्यक्तींनी आत्मसन्मान मिळवायचा असेल तर आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे.दिव्यांग व्यक्तींनी न्युनग्रड न बाळगता व्यवसाय करुन स्वालंबी बनावे.असे प्रतिपादन आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था कुरखेड्याच्या टीम व प्रकल्प समन्वयक संगीताताई तुमडे यांनी केले.

दिव्यांगव्यक्तींना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनिविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यासाठी आमचा सर्वोतोपरी सहभाग असेल, कामात सतत सोबत असेल. यावेळी त्या कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणुन दिव्यांग्यासोबत संवाद साधीत बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरवात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व अभिवादन करून झाली. तर प्रमुख अतिथी म्हणुन विदर्भ विकलांग संघटनेचे अध्यक्ष यशवंतकाका पाटणकर यांनी संघटना बनविण्याचा उद्देश व संघटनेच्या कामाची माहिती आपल्या मार्गदर्शनपर भाषनातून मांडली , वि. वि. सं. सदस्य वंदनाताई प्रधान आदीची उपस्थिती होती.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन, प्रतिकुल परिस्थितीवर मात करून स्वतःचा व्यवसाय थाटणाऱ्या दिव्यांग उद्योजग महिला सुनिताताई म्हस्के तळोधी, आणि दिव्यांग व्यक्ती भिमरावं लिंगायत नवेगाव (हुं )यांचा संगीताताई तुमडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. रेविति बगमारे बऱ्हडकिन्ही यांना यशवंत पाटणकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.यावेळी दिव्यांग बांधव दयालसिंग जुनी, प्रणय बांगरे, षडानन देशमुख, अरुण शेडे, फाल्गुण भोयर, सुनीता म्हस्के, पांडुरंग कावळे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार प्रहार दिव्यांगमंच चे अध्यक्ष व पत्रकार तुलोपचंद गेडाम यांनी पार पाडले. कार्यक्रमाच्या यश्वितेकारिता नितेश नागापुरे तालुका समन्वयक, अनिता बावणकर स्वयंसेविका,उपेंद्र बोरुले स्वयंसेवक, संतोष वाढोणकर, विकास लांजेवार, हेमंत वाकडे,पांडुरंग येरणे, श्रावण गेडाम, हिरामण ठाकरे, साहिलदास आत्राम, रुपेश मरहसकोले, देविदास कन्हाके, मधुकर बोरकुटे, प्रल्हाद मेश्राम, जीवन गुरनुले, आशिष लिंगायत आदींचे सहकार्य लाभले.कार्यक्रमांची सांगता सेन्हभोजनाने झाली.

# साई विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाला २०२४-२५ या नवीन सत्रात मान्यता प्रदान

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या अथक प्रयत्नाने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे चिमूर तालुक्यातील श्री. स्वामी नारायण बहुउद्देशिय संस्था, गडचिरोली द्वारा संचलित श्री. साई विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय भिसी ला (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय) राज्य शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या नवीन सत्रात शाळा सुरु करण्यासाठी मान्यता प्राप्त झाली आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून चिमूर तालुक्यातील भिसी क्षेत्रात विज्ञान व वाणिज्य शाखेतील शिक्षण सुविधांचा अभाव होता. विज्ञान व वाणिज्य शाखेतील शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना चिमूर, नागभीड, भिवापूर व उमरेड सारख्या शहरांमध्ये जावं लागत होतं. त्यामुळे विद्यार्थ्यांना जाण्यान्याची वर राहण्याची समस्या निर्माण झाली होती या समस्येची जाणीव आमदार बंटीभाऊंना होती, भिसी सारख्या तालुकास्तरीय शहरात विज्ञान व वाणिज्य हा अभ्यासक्रम स्थानिक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध व्हावा, आणि भिसी क्षेत्रातील ही पोकळी भरून काढण्यासाठी त्यांचा पूर्वीपासून प्रामाणिक प्रयत्न होता. आमदार बंटीभाऊंनी श्री. स्वामी नारायण बहुउद्देशिय संस्थेला मार्गदर्शन तथा प्रेरित करून भिसी येथील श्री. साई विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाला महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या सत्रात शाळा सुरु करण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज सादर केला आणि त्यासंदर्भातील सकारात्मक कार्यवाहीसाठी संपूर्ण मदत केली.

आमदार बंटीभाऊंनी केलेल्या अथक प्रयत्नांना व पाठपुराव्याला यश प्राप्त झाले असून राज्य शासनाकडून श्री. साई विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाला सन २०२४ ते २०२५ या वर्षात मान्यता प्रदान करण्यात आली आहे.सदर संस्थेच्या संचालक मंडळ व सभासदांनी आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांची चिमूर येथील निवासस्थानी भेट घेतली आणि संस्थेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत आभार व्यक्त केले. तसेच, शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सभासद गुणवंत अगडे, सभासद मनोज गोलजवार, उपाध्यक्ष पंकज मिश्रा, सचिव गणेश गभने, सभासद सौरभ दंदे, सभासद नितीन कायरकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# २१ मार्च रोजीचा वरोरा येथील लायसन्स कॅम्प रद्द

**चंद्रपूर**-उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे शिकाऊ अनुज्ञप्ती व पक्के अनुज्ञप्ती पूर्वनियोजित ऑनलाईन अपॉईंटमेंट नुसार देण्यात येतात. त्यानुसार वरोरा येथील शासकीय विश्रामगृहात २१ मार्च २०२४ रोजी लायसन्स कॅम्प आयोजित करण्यात आला होता. मात्र शासकीय विश्रामगृह उपलब्ध न झाल्याने वरोरा येथे २१ मार्च रोजी होणारा लायसन्स कॅम्प रद्द करण्यात आला असून पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी कळविले आहे.

# एडवोकेट अशोक कुमार भार्गव यांची नोटरी म्हणून नियुक्ती

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष एडवोकेट अशोक कुमार भार्गव यांचे नोटरी म्हणून नियुक्ती झाली आहे.



एडवोकेट अशोक भार्गव यांच्यासोबतच एडवोकेट रीना राठी, एडवोकेट हेमंत मंथनवार, एडवोकेट अंजुला चौबे,एडवोकेट अब्दुल सलीम, एडवोकेट राजेश अंबादे यांचीही नोटरी म्हणून नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त सर्व नोटरीचे तालुका पत्रकार संघाचे सावरिया मारोठीया, बहादूर चौधरी, अश्विन शहा,शाम चिचाटे,अविनाश भोपे, रवि केशरवानी, आशिष साहू, प्रविण फुसाटे, अरविंद भार्गव, हर्षल काळे, पंकज तिवारी, चंद्रकांत पवार, अमिन ओलिया, नितीन चरडे, अनुपकुमार भार्गव यांनी अभिनंदन केले आहे.

# २२ मार्च रोजी डाक अदालतीचे आयोजन

**चंद्रपूर**-डाक विभाग, चंद्रपूरच्या संदर्भात असलेल्या तक्रारी निकाली काढण्यासाठी २२ मार्च २०२४ रोजी प्रवर अधिक्षक डाकघर, चांदा विभाग येथे डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.या अदालतीमध्ये चांदा विभागातील निकाली न निघालेल्या तक्रारींचा आढावा घेतला जाईल. यात पत्र व्यवहार, स्पीड पोस्ट सेवा, काऊंटर सेवा, बचत बँक आणि मनिऑर्डर संदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यात येईल. नागरिकांनी आपापल्या तक्रारी दोन प्रतिमध्ये संबंधित विभागाचे नाव, अधिका-यांचे नाव आणि पदनामसहीत १८ मार्च किंवा त्यापुर्वी प्रवर अधिक्षक डाकघर, चांदा विभाग, चंद्रपूर येथे सादर करावयात. यानंतर आलेल्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही, असे डाक अधिक्षकांनी कळविले आहे.

# दिव्यांग बांधवाना १० ई-स्कूटरचे वितरण

## विकासकामे होतच राहील, दिव्यांगांसाठी काही करायची इच्छा होती-आमदार रणजित कांबळे

**वर्धा । प्रतिनिधी**

दिव्यांगाना ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. काहीकडे साधन नाहीय तर काहीनी तीनचाकी सायकल घेतल्या तर काही दिव्यांग बांधव हे पेट्रोलवर चालणाऱ्या गाडीने प्रवास करतातं. पेट्रेल गाड्यांचा खर्च त्यांना परवडत नाहीय. माझ्याकडे अनेक दिव्यांग बांधवांनी वाहनाची मागणी केलीय. त्यामुळे मी स्वत: मला जिल्हा खनिज विकास निधीतून प्राप्त झालेले १० लाख रुपये दिव्यांग बांधवांसाठी खर्च करण्याचं ठरवलं. त्या निधीतून दिव्यांग लाभार्थ्यांकरिता १० तीनचाकी ई-स्कूटर खरेदी केल्या. विकासकामांसाठी निधी मिळणारच आहे, विकासकामे हे नेहमीच होणार आहे. पण, दिव्यांगांसाठी काही करायची इच्छा होती, त्यामुळे दिव्यांगांसाठी ई-स्कूटर खरेदी केल्या. आणखी गरज पडल्यास पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येईल, असे



प्रतिपादन आमदार रणजित कांबळे यांनी केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत 'वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण' अंतर्गत देवळी मतदार संघातील दिव्यांग बांधवांना ई-स्कूटर वितरण कार्यक्रम वर्धा येथील पंचायत समिती सभागृहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला समाज कल्याण आयुक्त प्रसाद कुळकर्णी, वर्धा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संजय पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, वर्धा बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग देशमुख आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.यावेळी समाज काल्याण आयुक्त कुळकर्णी यांनी दिव्यांग बांधवांसाठी करण्यात येणारी ही मदत अत्यंत आनंदायी बाब आहे. ई-स्कूटर मिळाल्यामुळे दिव्यांगांना सहजच आपली कामे देखील करता येणार असल्याचे त्यांनी प्रास्ताविकेतून बोलताना सांगितले. पंचायत समितीत पार पडलेल्या कार्यक्रमात निरज रामकृष्ण करलुके रा. आपटी, वंदना ज्ञानेश्वर वडाळकर रा. वायफड, सुरज छगन करकुले रा. सावंगी येंडे, प्रशांत भाऊराव कोरडे रा. चानकी, कवडु मा. बोबडे रा साती, राजु केशव देशमुख रा. तरोडा, गणेश शालीक लोहारे रा. नेरी, ममता सदाशिव कांबळे रा. कवठा झोपडी, दीपक शंकर शिदोडकर रा. नागझरी, विलास सुदाम चालके रा. सोनेगाव स्टेशन अशा दहा दिव्यांग बांधवांना तीन चाकी ई-स्कूटरचा लाभ मिळाला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .